अपंग व्यक्ती (समानसंधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम १९९५ नुसार केंद्र शासनाने अपंगांच्या पद निश्चितीबाबत प्रसिध्द् केलेल्या यादीनुसार उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील कला संचालनालयाच्या गट- 'अ', 'ब','क' व गट-'ड' मधील पदावर शारीरिकदृष्टया अपंगासाठी सुयोग्य पदे निश्चित करणेबाबत...

# महाराष्ट्र शासन
## उच्च व तंत्र शिक्षण विभाग
## शासन निर्णय क्रमांक:- एडीआर-२०११/(१४/११)/ तांशि-६,
## मंत्रालय, मुंबई-४०००३२.
## दिनांक :- १४ जानेवारी २०११

**वाचा** :- १) अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम १९९५ (१९९६ चा-१)

२) शासन परिपत्रक, सा.प्र.वि.क्र. एसआरव्ही १०९८/प्र.क्र.१२/१६-अ, दिनांक ०२/०५/१९९८

३) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. अपंग १००५/(९१/०५)/आस्था-२,दि. १०/८/२००५.

४) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. अपंग २००६/(१६०/०६)/आस्था-२ दिनांक ०२ जुलै, २००८.

५) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. अपंग २००६/(१६०/०६)/आस्था-२ दिनांक ०१ जानेवारी, २००९.

६) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय, क्र.न्यायाप्र-२००९/प्र.क्र.५/सुधार-३ दिनांक ०३ ऑगस्ट, २०१०.

**प्रस्तावना :-** अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे सरक्षण) अधिनियम ,१९९५, दि.७ फेब्रुवारी १९९६ पासून लागू झाला आहे. या कायद्यामध्ये अपंगांच्या सर्वांगीण विकासासाठी व त्यांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यासाठी शासन सेवेत ३ टक्के पदे आरक्षित करण्याची तरतूद आहे. त्यानुसार सरळसेवा भरतीच्या पदावर अपंगांना आरक्षण विहित करणे / सुट देणे यासंदर्भात याचिका क्र.१२९/२००३ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार व पुर्नरचित तज्ञ समितीने केलेल्या सुधारणानुसार उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील कला संचालनालयातील गट-'अ' ते गट-'ड'संवर्गातील सरळसेवेने भरावयाच्या पदांसाठी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला होता. आता अंपग व्यक्तीसाठी सुधारीत पदनिश्चिती करण्यासंदर्भात मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिका क्र.२२५/२००९ संबंधात मा.उच्च न्यायालयाने केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार अपंगांसाठी शासकीय / निमशासकीय सेवेतील आरक्षित पदे सुनिश्चित करण्याचे निदेश दिले आहेत. त्यास अनुसरुन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने संदर्भ क्र. ६ अन्वये असे कळविले आहे की , केंद्र शासनाने अपंग व्यक्ती अधिनियम , १९९५ मधील तरतुदीस अनुसरुन त्यांच्या अखत्यारीतील आस्थापनेवरील अपंग व्यक्तींसाठी पदे निश्चित करुन यादी प्रसिध्द् केलेली आहे. तरी केंद्र शासनाच्या या यादीनुसार राज्य शासनाच्या अखत्यारीतील व निमशासकीय आस्थापनेवरील जी पदे समान आहेत ती पदे संबंधीत विभागांनी अपंगांसाठी निश्चित करण्यासाठी आदेश निर्गमित करावेत.

२. त्यास अनुसरुन उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील कला संचालनलयाअंतर्गत सरळसेवेने भरण्यात येणा-या गट- अ ते गट-ड संवर्गातील पदांबाबत अपंगांसाठी आरक्षण निश्चित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचारधीन होता.

**शासन निर्णय :-** अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे सरक्षण) अधिनियम ,१९९५ मधील तरतूदीनुसार केंद्र शासनाने ज्या यादीन्वये त्यांच्या अखत्यारीतील आस्थापनेवरील जी पदे अपंग व्यक्तींसाठी आरक्षण देण्यासाठी निश्चित केलेली आहेत, त्या यादीशी तुलना करुन उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील कला संचालनालयांअतर्गत गट-'अ' ते गट-'ड' या संवर्गातील सरळसेवा भरतीने भरावयाच्या पदांसाठी (केंद्र शासनाच्या यादीतील समान पदे विचारात घेऊन) सोबत जोडलेल्या परिशिष्टामधील तक्यात दर्शविल्याप्रमाणे अपंगांसाठी पदे सुनिश्चित करण्यात येत आहेत. हे आदेश या संदर्भात यापूर्वी निर्गमित केलेले आदेश अधिक्रमित करुन काढण्यात येत आहेत.

२. अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे सरक्षण) अधिनियम ,१९९५ या अधिनियमातील कलम ३२ व ३३ अनुसार उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील कला संचालनालयातंर्गत गट- 'अ', 'ब','क' आणि गट-'ड' मधील विविध संवर्गातील पदांवरील सरळसेवा भरतीमध्ये किमान ४० % अपंगत्व असलेल्या अधं/अल्पदृष्टी, कर्णबधीर व अस्थिव्यंग या प्रवर्गातील अपंग व्यक्तीसाठी प्रत्येकी १% या प्रमाणे ३% आरक्षण लागू राहील.

३. केंद्र शासनाच्या यादीतील पदांव्यतिरिक्त कला संचालनालयाच्या आस्थापनेवरील गट- 'अ', 'ब','क' आणि गट-'ड' मधील ज्या संवर्गातील पदांचा या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्टांमध्ये समावेश नाही, अशा संवर्गातील पदांचे अपंगांसाठी पद निश्चिती करण्याबाबतचे आदेश तज्ञ समितीच्या मान्यतेनंतर स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

४. हा शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णय क्र.न्यायप्र-२००९/प्र.क्र.५/सुधार-३, दि.३/८/२०१० अन्वये दिलेल्या निर्देशानुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१११०११७१६०८३८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(रं.रा.दोरसटवार)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रत :**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव.
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव.
४. मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव.
५. मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव.
६. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), मुंबई.
७. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), नागपूर.
८. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने)
९. उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, आस्था-२
१०. संचालक, कला संचालनालय, मुंबई.
११. निरीक्षक चित्रकला व शिल्प , महाराष्ट्र राज्य, मुंबई
१२. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. सामान्य प्रशासन विभाग, का.१६ अ व ब, (२ प्रती) मंत्रालय, मुंबई.
१४. कार्यासन अधिकारी, समन्वय कक्ष , उच्च व तंत्र शिक्षण विभाग , मंत्रालय, मुंबई
१५. निवड नस्ती साशि-६

D:\DOA\G.R\Handicapped GR.doc

# परिशिष्ट अ

अपंग व्यक्तीसाठी सुयोग्य पदाची निश्चिती

प्रशासकीय विभागाचे नांव : उच्च व तंत्र शिक्षण विभाग, तांशि-६

कार्यालयाचे नांव : कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

| अ. क्र. | पदनाम | शारिरीक पात्रता | सुयोग्य पदासाठी अपंगत्वाचा संवर्ग |
|---|---|---|---|
| १ | *कला संचालक | - | - |
| २ | *उपकलासंचालक | - | - |
| ३ | *निरीक्षक | - | - |
| ४ | अधिष्ठाता | S,ST,WH,C,RW | BLA,OL,HH |
| ५ | प्राध्यापक | S,ST,WH,RW | BLA,OL,HH |
| ६ | अधिव्याख्याता | S,ST,WH,C,RW | BLA,OL,HH |
| ७ | सहा. अधिव्याख्याता | S,ST,WH,C,RW | BLA,OL,HH |
| ८ | स्वीय सहाय्यक | SC,ST,SC,RW,H,C | OA,OL,BL,LV |
| ९ | परीक्षा नियंत्रक | SC,ST,SC,RW,H,C | OA,OL,BL,LV |
| १० | प्रबंधक | SC,ST,SC,RW,H,C | OA,OL,BL,LV |
| ११ | **लेखा अधिकारी | - | - |
| १२ | सहाय्यक निरीक्षक | SC,ST,SC,RW,H,C | OA,OL,BL,LV |
| १३ | अधिक्षक | S,RW,W,SE,MW,C | OL,OA,BL,HH,B,LV |
| १४ | टि.सहाय्यक/व.लि./कॉम्प्यूटर ऑपरेटर | S,ST,W,RW,H,C | OA,OL,BL,OAL,B.LV,HH |
| १५ | लिपिक-टंकलेखक | S,ST,W,L,MF,SE, | OA,OL,BL,OAL,B,LV, |
| १६ | * वाहन चालक | - | - |
| १७ | * फोरमन | - | - |
| १८ | * फाऊंड्री असिस्टंट | - | - |
| १९ | तंत्र सहाय्यक | S,ST,W,BN,MF,SE,RWH.C | OA,OL,BL,HH |
| २० | * गॅस विद्युत संधाता | - | - |
| २१ | * कुंभार-नि-परिचर | - | - |
| २२ | * उच्चश्रेणी लघुलेखक | - | - |
| २३ | निम्नश्रेणी लघुलेखक | S,ST,W,L,MF,SE,RW,H,C, | OA,OL,BL,OAL,B,LV, |
| २४ | ग्रंथपाल | S,BN,MF,AC,RW,C | OA,OL,OAL,BL,HH |
| २५ | सहाय्यक ग्रंथपाल | S,BN,MF,AC,RW,C | OA,OL,OAL,BL,HH |
| २६ | यंत्र परिचर | S,W,SE | HH,LV |
| २७ | नाईक | S,ST,WF,PP,L,KC,B,SE,H | OL,HH,LV/V |
| २८ | शिपाई | S,ST,WF,PP,L,KC,B,SE,H | OL,HH,LV/B |
| २९ | हमाल | S,ST,WF,PP,L,KC,B,SE | OL,HH,LV/B |
| ३० | सफाईगार | S,ST,WF,PP,L,KC,B,SE,H | OL,HH,LV,LV |
| ३१ | माळी | S,ST,WF,PP,L,KC,B,SE | HH,OL,LV |
| ३२ | पहारेकरी | S,ST,W,L,B,SE,H,RW | OL,HH,LV |
| ३३ | ग्रंथालय परिचर | S,ST,W,F,PP, L,KC,BN,MF,SE,H,RW | OA,OL,BL,HH,LV |
| ३४ | उदवाहक | S,ST,W.MF.SE.RW.H | OL.OA.LV.HH. |

* या चिन्हाने दर्शविलेली पदे एकाकी असून या पदांना अपंगांचे आरक्षण लागू नाही.

** या चिन्हाने दर्शविलेले पद प्रतिनियुक्तीने भरण्यात येते.

D:\DOA\G.R\Handicapped GR.doc